# संत गाडगे बाबा
# अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' श्रेणी मानांकीत)

# SANT GADGE BABA
# AMRAVATI UNIVERSITY
**(Accredited with 'A' Grade by NAAC)**

## छत्तिसावा दीक्षांत समारंभ
## THIRTY SIXTH ANNUAL CONVOCATION

मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर
यांचे
स्वागतपर व प्रास्ताविक भाषण

**Welcome Address and Introductory Remarks**
**by**
**Dr. Murlidhar Chandekar, Hon'ble Vice Chancellor**

शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०१९

**Friday, the 20th of December, 2019**

**छत्तिसावा दीक्षांत समारंभ**

**दि. २० डिसेंबर २०१९**

**मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे प्रास्ताविक भाषण**

नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे राज्यपाल व मा. कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी, प्रमुख अतिथी मा. खासदार श्री. संजय धोत्रे, समारंभास उपस्थित पूर्व-कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो...

विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो आणि आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेल्या प्रमुख अतिथींचा परिचय करून देण्याचे भाग्य लाभले, याबद्दल प्रथम आनंद व्यक्त करतो.

आज दीक्षांत समारंभासाठी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारी हे अध्यक्ष म्हणून लाभलेले आहेत. दि. १७ जून १९४२ साली जन्मलेल्या श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी अल्मोडा महाविद्यालयातून एम. ए. (इंग्रजी) ही पदवी संपादन केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी उत्तरप्रदेशातील एटा येथे अध्यापनाचे कार्य केले. महाविद्यालयीन जीवनातूनच त्यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी संघटनेचे ते महासचिव म्हणून निवडून आले होते. १९९७मध्ये उत्तरप्रदेश राज्याच्या विधान परिषदेवर ते आमदार म्हणून निवडून गेले. उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर ते तेथील राजकारणातील एक प्रमुख लोकनेते राहिले आहेत. उत्तराखंड राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळामध्ये त्यांनी ऊर्जा, पाटबंधारे, जलसिंचन, न्याय व विधिमंडळ कामकाज मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. सन २००१मध्ये ते उत्तराखंड राज्याचे मुख्यमंत्री झाले. २००२ ते २००७ या कालावधीत ते उत्तराखंड विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००८मध्ये ते राज्यसभेवर तर २०१४मध्ये नैनिताल-उधमसिंगनगर या लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी त्यांची महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. महामहीम राज्यपाल यांनी

राजकीय प्रवासात, सामाजिक-शैक्षणिक सेवेलाच अधिक महत्त्व दिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून लहानपणापासूनच ते सामाजिक जीवनात सक्रिय होते. उत्तराखंड राज्यातील टिहरी धरण प्रकल्पग्रस्त लोकांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. उत्तराखंड राज्यात अनेक शाळा-महाविद्यालयांची स्थापना केली. 'पर्वत पियुष' या साप्ताहिकाचे ते संस्थापक संपादक राहिले आहेत. 'उत्तरांचल प्रदेश क्यो?', 'उत्तरांचल : संघर्ष एवं समाधान' ही त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. सामाजिक जीवनासाठी राजकारणाचा वसा घेतलेले प्रमुख अतिथी सन्माननीय महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारी यांचे आजच्या दीक्षांत समारंभात मी स्वागत करतो. त्यांची उपस्थिती आम्हा सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

आजच्या समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी म्हणजे मा. खासदार श्री. संजय धोत्रे. श्री. संजय धोत्रे हे विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. विद्यापीठाचा एक माजी विद्यार्थी शिक्षणाशी संबंधित खात्याचा मंत्री होतो, याविषयी प्रथमतः मी आनंद व्यक्त करतो आणि त्यांचे स्वागत करण्याची संधी मला लाभली, हे माझे सद्भाग्य समजतो. मा. श्री. संजय धोत्रे हे अकोला लोकसभा मतदारसंघातून चौथ्यांदा लोकसभेवर निवडून आलेले खासदार असून सध्या भारत सरकारच्या मानव संसाधन विकास, दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि विधी या विषयांमध्ये पदवी प्राप्त केली आहे. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांनी ग्रामीण विकासासाठी कार्य केले असून केंद्र पातळीवर ग्रामीण विकास, कृषी, रेल्वे, सूचना व प्रसारण इत्यादी स्थायी समितीत सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. ग्रामीण विकासासाठी विदर्भाचे प्रतिनिधित्व देशपातळीवर करणाऱ्या या लोकप्रतिनिधीचे आजच्या दीक्षांत समारंभात मी सहर्ष स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. सन २००४मध्ये कर्मयोगी संत गाडगे बाबा ह्यांचे नाव या विद्यापीठाला देण्यात आले. अगदी स्थापनेपासूनच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करत, शिक्षणप्रसाराचे कार्य करणाऱ्या या विद्यापीठाशी आज ३९४ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित असून त्यांपैकी १३३ महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2(f)/12(B)सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरतर्फे ('नॅक'तर्फे) 'अ'श्रेणी प्राप्त करणारे आपले विद्यापीठ कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कटिबद्ध आहे. गुणवत्तेचे एक एक शिखर गाठणाऱ्या या विद्यापीठातर्फे

आजच्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विद्याशाखांमधील ४८० संशोधकांना आचार्य (पीएच.डी) पदवी, विविध परीक्षांतील गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्यांना ११२ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके, २४ रोख पारितोषिके तसेच ४०,६३५ विद्यार्थ्यांना पदवी व ७२ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आली.

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालये यांतून विविध शैक्षणिक कामे प्रगतिपथावर आहेत. 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना'च्या ('रुसा'च्या) माध्यमातून विद्यापीठात इमारतींचे नूतनीकरण, परिसर सौंदर्यीकरण आणि विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधून सहा संशोधनप्रकल्प राबविले जात असून या वर्षी उपयोजित परमाणू विभागातील प्राध्यापकाच्या 'लेझर मऊस नेव्हीगेशन सेन्सर सिस्टिम फॉर थिकनेस मेझरमेंट' या शोधशीर्षकासाठी तर जैवतंत्रज्ञान विभागातील प्राध्यापिकेच्या 'प्रोसेस फॉर इलिसिटेशन ऑफ ए स्ट्रेस इन्ड्यूस्ड ॲटीमायक्रोबियल मेटॅबोलाईट इन पॅसिफ्लोरा फोएटिडा एल' या शोधशीर्षकासाठी असे एकूण दोन एकाधिकार (पेटंट) प्राप्त झालेत.

केंद्रीय मनुष्य विकास मंत्रालयाच्या 'ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क' (GIAN) या योजनेअंतर्गत विद्यापीठास तीन आंतरराष्ट्रीय अल्पावधी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्याची संधी प्राप्त झाली. जैवतंत्रज्ञान विभागाने 'बेसिक इम्युनिओलॉजी ॲड इम्युनोथेरपी' तसेच 'एव्हीडन्स बेस्ड मेडिसीन : प्रिन्सिपल्य ॲड प्रॅक्टिसेस' या विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम तर भूगर्भशास्त्र विभागाने आय. आय. टी. खरगपूर यांच्या माध्यमातून 'हिस्ट्री ऑफ लाईफ ॲड मास एक्स्टिंशन इव्हेंटस' या विषयावरील प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. भूगर्भशास्त्र अभ्यासक्रमासाठी तज्ज्ञ म्हणून स्वित्झरलॅंड येथील टॅरी एडीटी यांना आमंत्रित करण्यात आले होते. जुलै २०१९मध्ये भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या सहकार्याने RESPOND या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत ६ स्टार्ट अपची नोंदणी झालेली आहे. मानव संसाधन विकास मंत्रालय, इनोव्हेशन सेल, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून विद्यापीठास इन्स्टिट्यूट इनोव्हेशन सेल (आय.आय.सी.) स्थापन करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. या वर्षी मार्च २०१९ आणि सप्टेंबर २०१९मध्ये स्टार्ट अप स्पर्धांमधून संशोधक विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील नावीन्यपूर्ण मॉडेल्स

सादर केलेत. इन्क्युबेशन सेंटरला अत्यावश्यक असणाऱ्या सेक्शन ८ अंतर्गत कंपनीची स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून स्टार्ट अप क्रियान्वयनासाठी महाराष्ट्र शासनाकडून विद्यापीठास पाच कोटींचे अनुदान अपेक्षित आहे. त्यापैकी या वर्षी पंचवीस लक्ष रुपये प्राप्त झालेले आहेत.

नॅक, बेंगलूरु यांच्या माध्यमातून विद्यापीठ आय.क्यू.ए.सी.ने 'असेसर्स ओरियंटेशन प्रोग्रॅम'चे यशस्वीपणे आयोजन केले. या उद्बोधन वर्गासाठी देशभरातून ५४ व्यक्तींनी सहभाग घेतला. तसेच विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांपैकी प्राणिशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग, गणित विभाग यांनी राष्ट्रीय चर्चासत्र-परिषदांचे आयोजन केले.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांविषयी आदर व अभिमान व्यक्त करण्यासाठी विद्यापीठाने या वर्षीदेखील 'मराठी भाषा गौरव दिना'चे भव्य प्रमाणात आयोजन केले. प्रसंगी विद्यापीठाच्या इंद्रधनुष्य स्पर्धेतील सहभागी चमूने, मराठमोळ्या कला-संस्कृतीचा आविष्कार करणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दि. ५ व ६ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, सांस्कृतिकी, भुवनेश्वर आणि कलाशिखर फाऊंडेशन, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात १३८ नर्तक कलाकारांच्या एकूण ३२ चमूंनी कथ्थक, भरतनाट्यम, ओडिसी, कुचिपुडी, छऊ, लावणी, कोळीनृत्य, गोंधळ व तुरथाल इत्यादी नृत्यशैलींचे सादरीकरण केले. या महोत्सवात रशिया येथील ४ शास्त्रीय नृत्यांगनांचा सहभाग राहिला, हे विशेष.

विद्यापीठाच्या 'नॅशनल रिसोर्स सेंटर'च्या माध्यमातून या वर्षी ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच 'व्हर्च्युअल सी फोर' या उपक्रमाद्वारे विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा समाजाला लाभ घडवून देण्यात येत आहे.

विद्यापीठाचा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थी. शिक्षणाच्या क्षेत्रात उच्च गुणवत्ता संपादन करणारे विद्यार्थी इतर क्षेत्रांतूनही गुणवत्ता सिद्ध करीत आहेत. अभ्यासाबरोबरच संशोधनक्षेत्रातही विद्यार्थी प्रगती करीत आहेत. १३व्या 'आविष्कार' स्पर्धेत मेडिसिन आणि फार्मसी या गटात विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यास प्रथम स्थान तसेच राष्ट्रीय पातळीवरील 'अन्वेषण' स्पर्धेत सामाजिकविज्ञान वर्गवारीत दुसरे व आरोग्यविज्ञान वर्गवारीत तिसरे पारितोषिक पटकावले.

सप्टेंबर २०१९मध्ये, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नोव्हेंबर २०१९मध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत

विद्यापीठ चमूने तृतीय स्थान प्राप्त केले.

क्रीडा स्पर्धांमध्येदेखील विद्यापीठ चमूंनी उत्तम कामगिरी बजावली. सत्र २०१८-२०१९मध्ये इटलीमधील नेपोली येथे संपन्न झालेल्या विश्व आंतर विद्यापीठ धनुर्विद्या (पुरुष) स्पर्धेत विद्यापीठाच्या खेळाडूने सहभाग नोंदविला. २०१९मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत बॉक्सिंग (पुरुष) प्रकारात द्वितीय स्थान, धनुर्विद्या (पुरुष व महिला) प्रकारांत इंडियन ५० मीटर राऊंड प्रत्येकी एक सुवर्णपदक, इंडियन ३० मीटर वैयक्तिक ऑलंपिक राऊंड सुवर्णपदक, कंपाउंड राउंड ५०-२ मीटर सुवर्णपदक, रिकव्हर ७० मीटर-१ सुवर्णपदक, रिकव्हर टीम राऊंड रौप्यपदक तसेच फेब्रुवारी २०१९मध्ये मुंबई येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात १०० मीटर, लांब उडी, या मैदानी स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी प्रथम स्थान पटकावले. दि. ५ ते ९ डिसेंबर २०१९ या कालावधीत विद्यापीठाने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत पाच राज्यांतून ६१ विद्यापीठांच्या ७२० खेळाडूंनी सहभाग घेऊन दमदार कामगिरीचे प्रदर्शन केले.

सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी विद्यापीठातर्फे उपयोजित कौशल्य विकास वर्गांचे आयोजन करण्यात आले. बांबू कल्चरला चालना देण्यासाठी बांबू व हस्तकला केंद्राच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन, अध्यापन या बाबींकडे लक्ष पुरविणाऱ्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांची तरतूद केली आहे. विविध योजनांमधून ३८५ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेत ३८३ महाविद्यालये आणि २९ पदव्युत्तर विभागांतील एकूण २,०१,०३४ विद्यार्थ्यांचा सुरक्षा विमा काढण्यात आला आहे. तसेच कौशल्य विकास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ४५०० विद्यार्थ्यांनी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. अंदाजे ८००० विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे निःशुल्क प्रशिक्षण देण्याची योजना असून, त्यासाठी विद्यापीठाने आठ लक्ष रुपये एवढ्या निधीची तरतूद केलेली आहे. याशिवाय विद्यापीठाच्या 'ट्रेन द ट्रेनर' उपक्रमातून ९१ प्राध्यापकांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे प्राध्यापक विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी ट्रेनर म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून, स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, महिला सक्षमीकरण कार्यशाळा, आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण शिबिर, उन्नत भारत अभियान कार्यशाळा, आदिवासी कुमारी माता कार्यशाळा, जागतिक एड्स- प्रतिबंध व नियंत्रण रॅली, युवा प्रशिक्षण शिबिर इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांपैकी यवतमाळ येथील सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय आणि मूर्तिजापूर येथील श्री गाडगे महाराज महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सेवाकार्य केले. संकटकाळी देशबांधवांच्या मदतीला धावून जाणाचे सामाजिक भान दाखविणाऱ्या संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. सामाजिक बांधिलकीचा पुरस्कार करत विद्यापीठाने झरी झामणी येथे कुमारी मातेच्या प्रश्नाविषयी जाणीवजागृती केली. या प्रश्नावर संशोधन प्रकल्प राबविला. तेथे महिलांसाठी आरोग्य समुपदेशन आणि आरोग्य चिकित्सा वर्ग तसेच लहान मुलांसाठी संस्कार वर्ग यांचे आयोजन केले. यासाठी ११ महाविद्यालयांचे सहकार्य लाभले.

केंद्र शासनाच्या उन्नत भारत अभियानांतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रातील दत्तक घेण्यात आलेल्या २७० गावांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने ग्रामविकासाचे कार्य सुरू आहे. विद्यापीठाच्या उन्नत भारत अभियान केंद्रास आता विभागीय समन्वय संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे.

विद्यापीठाने पर्यावरणपूरक जीवनाचा पुरस्कार करण्यासाठी, हिंगणघाट येथील पी. व्ही. टेक्सटाईल यांच्या सी.एस.आर. निधीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तीन लक्ष रुपयांतून, विद्यार्थ्यांसाठी सायकल सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यातून वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या सुविधेसाठी विद्यापीठ परिसरात ४० सायकली उपलब्ध करून दिल्या जातील. या वर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात बकुळ प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली तसेच वनमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील 'पर्यावरण पुरस्कार' तसेच 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार' विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात आलेत.

विद्यापीठाच्या 'ज्ञानस्रोत केंद्रा'द्वारे या वर्षी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या व उत्तम गुणवत्ता विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पुस्तक पेढी

योजना' सुरू करण्यात आली. याशिवाय, या केंद्राद्वारे महाविद्यालयांसाठी अभ्यासिका, लायब्ररी नेटवर्क, कन्सॉर्शिया सेवा इत्यादी उपक्रम राबविले जातात. 'वाचन प्रेरणा दिना'निमित्त बुक टॉक स्पर्धा आणि संशोधनपर निबंध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थी मित्रहो, उच्च शिक्षण पूर्ण करून, तुम्ही आता जीवनाच्या विविध क्षेत्रांत मार्गक्रमण करणार आहात. तेव्हा संत गाडगे बाबांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्यांचा अंगीकार करून तुम्ही वाटचाल करावी, असे या प्रसंगी मी सांगेन. संत गाडगे बाबांचे कर्मनिष्ठेचे सूत्रच आपल्याला महान बनवेल, हे लक्षात ठेवा. आपला देश भौतिक प्रगतीची उंच शिखरं गाठत असताना सामाजिक विषमता वाढणार नाही, यासाठी आपण दक्ष राहिले पाहिजे. महिला अत्याचार, कुमारी माता, मेळघाटातील कुपोषण, शेतकरी आत्महत्या अशा प्रश्नांपासून आपण समाजाला मुक्त केले पाहिजे. आपले शिक्षण सामाजिक चळवळीसाठी फलदायी ठरले पाहिजे. विकासाची दारं सगळ्यांसाठी उघडी आहेत, असा विश्वास सगळ्या समाजघटकांना मिळाला पाहिजे. एकविसाव्या शतकात कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनावर आक्रमण करीत असताना, आपल्याला विवेकबुद्धीचा जागर अविरत सुरू ठेवावा लागणार आहे. संत नामदेवांनी "नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी"असे म्हटले होते. त्याला अनुसरून, आपण ज्ञानरूपी दीपातून जगावर प्रकाशाचा वर्षाव करावा, एवढी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि पुढील वाटचालीसाठी तुम्हाला शुभेच्छा देतो.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत. पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**धन्यवाद !**

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**